प्रसिध्दी पत्रक दिनांक :२६/०७/२०२३

**स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालयाचे सहाय्यक संचालक यांनी नांदेड जिल्हयातील ६६ ग्रामपंचायतीचे सन २०२१—२२ चे लेखापरीक्षणाचे काम दिल्याचा मोबदला म्हणुन ६०,०००/— रूपये लाचेची मागणी केल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे. शिवाजी नगर गुरंनं 238/2023 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा 1988 (डिमांड) |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक २५.०७.२०२३ रोजी २२.५४ वा. |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | संतोष हणमंतराव कंदेवार, वय ४५ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद — सहाय्यक संचालक, नेमणूक — स्थानिक निधी लेखा परिक्षा कार्यालय, नांदेड, रा. कृष्णकुंज निवास, पाटबंधारे नगर, तरोडा बु. नांदेड, ता. जि. नांदेड. (वर्ग—१) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ७०,०००/— रूपयाची मागणी करून तडजोडीअंती ६०,०००/— रूपयाची लाच मागणी |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांच्याकडे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या लेखा परिक्षणाचे कर्तव्य असून आलोसे हे त्यांचे कार्यालय प्रमुख आहेत. आलोसे यांनी तक्रारदार यांना नांदेड जिल्हयातील ६६ ग्रामपंचायतीचे सन २०२१—२२ चे लेखापरिक्षण करून अहवाल सादर करण्याचे लेखी आदेश दिले होते. तक्रारदार यांचेकडे ग्रामपंचायत लेखा परिक्षणाचे काम दिल्याचा मोबदला म्हणून ज्या ग्रामपंचायतीचे खर्च पाच लाख आहे त्यास १०००/— रू प्रति ग्रामपंचायत, ज्या ग्रामपंचायतीचे खर्च दहा लाखापर्यंत आहे त्यास २०००/— रू प्रति ग्रामपंचायत व ज्या ग्रामपंचायतीचे खर्च दहा लाखापेक्षा जास्त आहे, त्यास १०,०००/— रू प्रति ग्रामपंचायत असे एकुण ६६ ग्रामपंचायतीचे ७०,०००/— रूपये दयावे लागतील म्हणून तक्रारदार यांच्याकडे मागणी केली होती. वर नमूद प्रमाणे रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांची खात्री झाल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली.<br><br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडकडून लाच मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान यातील आलोसे यांनी तक्रारदार यांना टोटल सत्तर करून टाक असे म्हणुन ७०,०००/— रू ची मागणी केली, तेव्हा तक्रारदार यांनी काही कमी करा अशी विनंती केल्याने आलोसे यांनी तडजोडीअंती ६०,०००/— रूपयाची लाच मागणी दोन पंचासमक्ष केली म्हणुन आलोसे विरूध्द सदरचा गुन्हा नोंद करून अटक करण्यात आली आहे. |
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र नांदेड चे डॉ.श्री राजकुमार शिंदे, पोलीस अधीक्षक,यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी श्री राजेंद्र पाटील, पोलीस उप अधीक्षक तसेच सापळा कार्यवाही पथक पोनि श्री. गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, पोना/ राजेश राठोड, पोकॉ/ ईश्वर जाधव, पोकॉ/सयद खदीर, चापोह/गजानन राउत, चापोह/मारोजी सोनटक्के, चापोना/प्रकाश सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | श्री. गजानन बोडके पोलीस निरीक्षक लाप्रवि नांदेड, हे करीत आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तकार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| **संपर्क पत्ता :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड** | |
|---|---|
| **संपर्क कमांक :— 02462—253512**<br>**टोल फी कमांक— 1064** | **ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन** acbmaharashtra.net |
| **मा. पोलीस अधीक्षक 9623999944** | **पोलीस उपअधीक्षक 7350197197** |
| **ई—मेल आयडी**<br>spacbnanded@gmail.com | dyspacbnanded@gmail.com |
| **FACEBOOK – Dysp Acb Nanded** | **TWITTER - @ACBnanded** |
| **INSTAGRAM – acb_nanded** | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.विभाग, नांदेड युनिट

Scanned with CamScanner